प्रभात पुणे, मंगळवार, दि. १९ फेब्रुवारी २०१९

Zeal College of Engineering & Research
LIBRARY
752
ZCOER
Narhe, Pune-41.




**पुणे :** झील इंजिनिअरिंग कॉलेजला व्हॅकेथान स्पर्धेत कांस्यपदक मिळाले. यावेळी पदकासोबत विद्यार्थी.

# व्हॅकेथॉन स्पर्धेत झील इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना कांस्यपदक

**पुणे, दि. १८ –** आय. आर. टी. टेक्नॉलॉजी यांच्याकडून 'इंडियाज सेकंड रेड हाट चॅलेंज डे' निमित्त व्हॅकेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत झील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि रिसर्च इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी विभागातील द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी कांस्यपदक जिंकले. नुकत्याच झालेल्या बक्षीस वितरण कार्यक्रमात रेड हॅट अॅकडमीचे मॅनेजर यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. यावेळी आय. आर. टी. टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड गयाज शेख यांच्यासह पदाधिकारी, स्पर्धक उपस्थित होते. या स्पर्धेत झील इंजिनिअरिंग महाविद्यालयातील विद्यार्थी ओमकार संकपाल, आदर्श दुबे, शिवकृष्ण राजपुरोहित आणि अश्वत्थी पनिकर यांनी सहभाग घेतला होता. त्यांना प्रा. निहाल शिकलगार यांनी मार्गदर्शन केले. या विजेत्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे कार्यकारी संचालक जयेश काटकर, कॅम्पस डायरेक्टर डॉ. संजय देवकर, प्राचार्य अजित काटे, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. स्वप्नजा उबाळे यांनी कौतुक केले.